**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

**दिनांक २७/०८/२०२६ (गुरूवार )**

.................................................................................................

## मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे उपस्थितीत नगपुर ग्रामीण जिल्हयातील Social Media Influencers सोबत चर्चा आणि संवाद सत्राचे आयोजन

आज दिनांक २७/०८/२०२६ रोजी पोलीस भवन, नागपुर येथे मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे प्रमुख उपस्थितीत नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील **Social Media Influencers** सोबत चर्चा व संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले होते. सदर संवाद सत्रात मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक यांनी नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील **Social Media Influencers** शी विविध विषयांवर सकारात्मक संवाद साधला. या प्रसंगी नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलामार्फत करण्यात आलेल्या उल्लेखनीय कामगिरीचे तसेच विविध उपक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. **Social Media** माध्यमांचा जबाबदारीने व समाजहितासाठी वापर, पोलीस—जनता समन्वय वाढविणे, तसेच नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली. संवाद सत्रादरम्यान उपस्थित **Social Media Influencers** नी विविध विषयांबाबत **विचारलेल्या प्रश्नांचे व शंकांचे** मा. श्री. हर्ष पोद्दार यांचेकडुन **निराकरण करण्यात आले**.

**सदर चर्चा व संवाद सत्राचे माध्यमातुन मा.श्री हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण यांनी सोशल मीडिया हे केवळ माहिती प्रसारित करण्याचे माध्यम नसून, नागरिकांचा विश्वास संपादन करण्याचे आणि समाजामध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्याचे प्रभावी माध्यम आहे,असा संदेश दिला.** नागरिकांपर्यंत अधिकृत व विश्वासार्ह माहिती पोहोचविण्यासाठी तसेच समाजामध्ये सकारात्मक जनजागृती निर्माण करण्यासाठी

**Social Media Influencers** नी **Social Media** चा वापर करावा, असे आवाहन मा **वरिष्ठ पोलीस अधीक्षक यांच्याकडुन** करण्यात आले.

सदर चर्चा व संवाद सत्रासाठी श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्रीमती पुजा गायकवाड, पोलीस उपअधिक्षक (गृह), श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक, सावनेर उपविभाग, श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक, उमरेड उपविभाग,श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी रामटेक उपविभाग,श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी काटोल उपविभाग हे उपस्थित होते.









## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड :—** दिनांक २६/०८/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पेट्रोलीग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मध्यप्रदेश राज्यामधून नरखेड मोहदी दळवी मार्गाने अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मोहदी दळवी रोड येथे नाकाबंदी केली असता संशयित १२ चक्का टिप्पर क्र. एम.एच. ३२/ए जे १२१२ मिळुन आले. वाहन थांबवुन पाहणी केली असता चालक नामे १) पंकज हिरालाल तुमडाम, वय ३२ वर्ष, रा. हवेली मोहगाव, ता. पांढुर्णा म. प्र. हा मिळुन आला. मालकाबाबत विचारपुस केली असता २) मालक प्रफुल ज्ञानेश्वर कांबळे, वय ४२ वर्ष, रा. सावरगाव, ता. नरखेड अशी माहिती प्राप्त झाली. त्याला परवान्याबाबत विचारणा केली असता त्याच्या कडे परवाना नव्हता. वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. चालक हा वाहनात क्षमतेपेक्षा जास्त ५.९७ ब्रास

अवैध रेतीची वाहतुक करतांना मिळुन आल्याने पोलीसांनी पंचासमक्ष १) १०.६८ ब्रास रेती किंमती ५३,४००/— रूपये आणि २) १२ चक्का टिप्पर क्र. एम.एच. ३२/ए जे १२१२ किंमती २०,००,०००/—रूपये असा एकुण २०,५३,४००/**—रूपया**ंचा मुददेमाल जप्त केला आहे.

**सदर प्रकरणी वाहन नमुद चालक १) पंकज हिरालाल तुमडाम, वय ३२ वर्ष, रा. हवेली मोहगाव, ता. पांढुर्णा म. प्र. व मालक २) प्रफुल ज्ञानेश्वर कांबळे वय ४२ वर्ष रा. सावरगाव ता नरखेड यांच्या विरूध्द पोस्टे नरखेड येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं सहकलम ६६(१)/१९२(अ), २०७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद
## ०३ गोवंश जनावरांची सुटका, आरोपी अटक
## कुही पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कुही** :– दिनांक २६/०८/२०२६ रोजी कुही पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन कुही हद्दीतील मौजा मांढळ येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान पोलीसांना मांढळ कडुन कुही कडे येणारी एक संशयित बोलेरो गाडी क्र. एम. एच.– ४०/ए के –१२९४ येताना दिसले. पोलीसांनी वाहन थांबवून तपासणी केली असता चालक नामे सतिश देविदास मोहरकर, रा. आकोट, ता. पवनी, जि. नागपुर हा मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष सदर वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०३ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून बोलेरो गाडी क्र. एम. एच.– ४०/ए के –१२९४ किंमती ३,००,०००/– रूपये आणि ०३ गोवंश जनावरे किंमती ३५,०००/– रूपये असा एकुण किंमती ३,३५,०००/– रूपयाचा मुददेमाल जप्त केला.

नमुद प्रकरणी आरोपी चालक नामे सतिश देविदास मोहरकर, रा. आकोट, ता. पवनी, जि. नागपुर यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन कुही येथे कलम ११(१), (ड), (ई) प्राण्यांचा छळ अधिनियम १९६०, सहकलम ५ ए, ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम, सहकलम १८४, १३०/१७७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०३ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २६/०८/२०२६ रोजी पोलीस स्टेशन रामटेक येथे विशेष मोहिम राबवुन अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०३ आरोपीतांवर कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन रामटेक** अंतर्गत आरोपी १) अमन राहुल गेडाम, वय २२ वर्ष, रा. वार्ड क्र.०१, शितलवाडी रामटेक हा शितलवाडी रामटेक येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **तसेच आरोपी २)** सागर बाबुराव गाते, वय ३० वर्ष, रा. गणपतीनगर भोजापुर, रामटेक हा भोजापुर, रामटेक येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. ३) आरोपी अनुराग नंदकिशोर शुक्ला, वय २० वर्ष, रा. बघाह, त.रघुराज सतना सध्या ह.मु भाग्यश्री कॉलनी, रामटेक वार्ड क्र.०१ हा आंबाळा तलावाच्या बाजुला खाली जागेमध्ये सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

## अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीतांविरूध्द ०३ गुन्हे नोंद

**पोलीस स्टेशन उमरेड :—** दिनांक २६/०८/२०२६ रोजी उमरेड पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता मौजा वायगाव घोटुर्ली शिवारात आरोपी क्र. १) पोशन किसन नौरंगे, वय ३२ वर्ष, संतनगर झोपडपटटी वेकोली कॉलनी, ता. उमरेड तसेच आरोपी २) राधेश्याम श्यामरतन डहेरीया, वय ३० वर्ष, संतनगर झोपडपटटी वेकोली कॉलनी, ता. उमरेड हा पाटीलवाडा हॉटेलचे पाठीमागे कावरापेठ, ता. उमरेड येथे स्वत:चे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी फिरतांना मिळुन आले. पोस्टे एमआयडीसी बोरी अंतर्गत पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता मोरारजी कंपनी एमआयडीसी बोरी येथे आरोपी १) सचिन किसनजी नारनवरे, वय ३२ वर्ष, रा. तलमले ले आउट बुटीबोरी जि नागपुर २) आकाश गणेश गावंडे, वय २७

वर्ष, रा. वर्धमान नगर बुटीबोरी, जि.नागपुर हे स्वतःचे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी फिरतांना मिळुन आले. नमुद आरोपी हे दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने आरोपीतांचे विरूद्ध कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये ०३ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## नागपूर ग्रामीण पोलिसांनी राबवली अवैध दारूविरोधात विशेष मोहीम दारूबंदी कायद्यान्वये २८ गुन्हे दाखल

**दिनांक २६/०८/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण पोलिसांकडून अवैध दारूविक्री, दारूची साठवणूक करणाऱ्यांविरूद्ध विशेष जनजागृती व अंमलबजावणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान नागपूर ग्रामीण जिल्ह्यात दारूबंदी कायद्यान्वये एकूण २८ गुन्हे दाखल करण्यात आले. यामध्ये अवैध दारूविक्री तसेच दारूची वाहतूक करणाऱ्यांविरुद्धही नियमांनुसार कारवाई करण्यात आली आहे.**

**पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन काटोल येथे** १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही येथे ०१** गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पाचगाव येथे** ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन** भिवापूर **येथे** १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन देवलापार येथे** ३ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन पारशिवनी येथे** २ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन** सावनेर **येथे** ९ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन** मोहपा **येथे** १ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन केळवद येथे** १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन खापा येथे** ०२ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन** कळमेश्वर **येथे** ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन** बोरी **येथे** ०१ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ५४४५० मिली देशी दारू, १०० लिटर मोहाफुल दारू तसेच वाहन असा एकुण १,५५,१५०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

# नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०८ गुन्हे नोंद.एकुण ९२७०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक २६/०८/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या ५२ ताशपत्ते तसेच सट्टापट्टी जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन ५२ ताशपत्ते, सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण ९२७०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०८ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन वडोदा** येथे **आरोपी नामे १**) विजय बंडुजी साहारे, वय २९ वर्षे, रा. वार्ड क्र ०४, वडोदा ता. कामठी २) संकेत ओमप्रकाश सिवने, वय २८ वर्षे, रा. वार्ड क्र ०१, वॉटर टॅक जवळ कापसी हे अवैधरीत्या सट्टापट्टीचा जुगार खेळताना मिळुन आले. **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे १) वामन बाबुराव वानखेडे, २) वासुदेव दिनकर सोमकुवर, ३) नितीन शेषराव शेळके, तिन्ही रा. थाडुरवाडा ता. काटोल, जि. नागपूर ४) सुनिल सहादेवराव खडसे, रा. भिष्णुर, ता. जलालखेडा, जि. नागपूर हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले. **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे १) किशोर सुधाकर धुर्वे, वय ३६ वर्ष, २) रामेश्वर संतोष सलामे, वय ३७ वर्ष ३) विलास रामचंद्र कवडती, वय ३५ वर्ष, तिन्ही रा. चोरखैरी, ता. नरखेड ४) विजय चिरकुट पराडकर, वय २८ वर्ष, रा. हीवरा, ता. जि. पांढुर्णा म. प्र. हे अवैधरीत्या जुगार खेळताना मिळुन आले. **तसेच** आरोपी नामे प्रेमलाल माधोराव मसराम, वय ५५ वर्ष, रा. खेडी मन्नाथ ता. नरखेड २) गोंविंद कीसनुजी पराडकर, वय ३८ वर्ष, ३) शामराव गणु गोभाडकर, वय ५२ वर्ष ४) राजेश रामाजी घारपुरे वय ३४ वर्ष  तिन्ही रा. हीवरा ता. जि. पांढुर्णा म. प्र. हे अवैधरीत्या जुगार खेळताना मिळुन आले. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे आरोपी नामे १) गुनवंता बापुरावजी भाकरे, वय ४५ वर्ष, रा. वार्ड क्र. ०३ कळमेश्वर २) अभिजीत प्रमोद बांबल, वय २१ वर्ष, रा. झेंडाचौक कळमेश्वर ३) नितीन मधाकर बांबल, वय ४३ वर्ष, रा. झेंडाचौक कळमेश्वर हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले. **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे १) अंकुश नारायण माकडी, वय ४५ वर्ष, रा. वार्ड क्र ६ भिवापूर, ता भिवापूर जि. नागपूर २) आरोपी विक्की उर्फ मेंढी खापरीकर, रा. महाविदयालय रोड भिवापूर हे अवैधरीत्या सट्टापट्टीचा जुगार खेळताना मिळुन आले. **पोलीस स्टेशन**

**एमआयडीसी बोरी** येथे आरोपी नामे आकाश अन्ना बोरकर, वय ३१ वर्षे, रा. वित्तुबाबा मंदीर टाकळघाट, ता. हिंगणा, जि. नागपुर हा अवैधरीत्या सट्टापट्टीचा जुगार खेळताना मिळुन आला.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने